पुण्य नगरी
सोमवार, ४ डिसेंबर २०१७ पुणे

# नवमहाराष्ट्र विद्यालयात 'शाळांगण' उपक्रम



पिंपरी : प्रतिनिधी

पंख संस्था, क्विकहील फाउंडेशन व रयत शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरीतील नवमहाराष्ट्र विद्यालय येथे 'शाळांगण' प्रकल्पांतर्गत मुलांसाठी जाणीव जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या वेळी पोलीस उपनिरीक्षक रत्ना सावंत आणि पवन पाटील उपस्थित होते. पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, क्विकहील फाउंडेशनचे सीएसआरप्रमुख अजय शिर्के, विश्वस्त सीमा ननवरे व मुख्याध्यापक उत्तम पाटील, मुख्याध्यापिका शारदा जाधव उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात पोलीस उपनिरीक्षक रत्ना सावंत आणि पवन पाटील यांनी मुलांना छेडछाड, विनयभंग यासंबंधीच्या कायद्यांबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. तसेच भारतातील मुली सक्षम असून त्यांनी या प्रकरणी कशी पावले उचलली पाहिजेत, यासंदर्भात मुलींना आणि छेडछाड, रॅगिंग, विनयभंग अशा गोष्टी केल्यास कोणते गुन्हे दाखल होऊन कशी शिक्षा होऊ शकते व कोणत्या मित्रांपासून लांब राहणे योग्य आहे, यासंदर्भात योग्य अशा पद्धतीने मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली.